# नाशिक कॉलिंग

बुधवार, दि. २ ऑगस्ट २०२३ | ● वर्ष - १ | ● अंक ४ | ● एकूण पाने: ४ | ● मूल्य - २ रुपये | ● RNI: MAHMAR51790

# एम.जी. रोडवरील पार्किंगचा प्रश्न सुटणार कधी?

**बातमी तुमची-आमची** एम.जी. रोडवर मोठी बाजारपेठ असूनही इथल्या पार्किंग व्यवस्थेचा प्रश्न अनेक वर्षांपासून जैसे-थे आहे...

## एम.जी. रोडला पोलिसांकडून वाहनांवर कारवाई; व्यापारी आक्रमक

**नाशिक कॉलिंग (प्रतिनिधी):** आज महात्मा गांधी रोड परिसरात दुकानांसमोरील पार्क केलेल्या वाहनांवर पोलिसांनी दंडात्मक करवाईचा बडगा उगारला. या कारवाई विरोधात येथील व्यापारी वर्गाकडून दुकाने बंद करत निषेध नोंदवण्यात आला... महात्मा गांधी रोड परिसरात पोलिसांचे पथक दाखल होत पार्क केलेल्या गाड्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. अचानकपणे पोलिसांनी ही कारवाई केल्यामुळे येथील व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली.

त्यानंतर व्यापारी वर्ग आक्रमक होत त्यांनी पोलिसांच्या कारवाई विरोधात आंदोलन सुरु केले. परिसरातील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद करत पोलिसांच्या कारवाईचा निषेध नोंदवला.

दरम्यान, यावेळी महात्मा गांधी रोडवर काही काळ वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. “कारवाई करण्याआधी पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. आमच्या दुकानात येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांवर अशा प्रकारे कारवाई होत असेल तर ग्राहक येणार नाहीत. त्यामुळे व्यावसायिकांचे नुकसान होते” अशा भावना व्यावसायिकांनी व्यक्त केल्या आहेत.

### भिडेंच्या वादग्रस्त विधानावरून ठाकरेंचा फडणवीसांना टोला

वृत्तसंस्था | मुंबई

मुंबई - संभाजी भिडे यांच्या वादग्रस्त विधानाने महाराष्ट्राचं राजकारण तापलं आहे. राज्यभरात भिडेंच्या विधानांचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे. यावरून उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केलं आहे. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला. संभाजी भिडेंच्या वादग्रस्त विधानावर उद्धव ठाकरे म्हणाले की, संभाजी भिडेंवर सरकारने बोलायला पाहिजे. ते जर भिडेंना गुरुजी मानत असतील तर सगळ बरोबर आहे, असच समजाव लागेल, असा टोला फडणवीसांना लगावला. मात्र गुरुजींनी चांगले धडे द्यावेत. तसेच इतिहास उगळून काही फायदा नाही. केवळ भविष्यापासून लक्ष विचलीत करण्यासाठी हे सुरू असल्याचही उद्धव ठाकरे म्हणाले. फडणवीसांनी आज सभागृहात संभाजी भिडे यांचा गुरुजी म्हणून उल्लेख केला होता.

**आरोग्य |** रुग्णांनी जवळच्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र किंवा रुग्णालय येथे सपंर्क साधून उपचार घ्यावे

## महाराष्ट्राला जडलाय डोळ्यांचा आजार; राज्यात एक लाखाहून अधिक जणांचे 'डोळे आले'

**मुंबई** | 'डोळे तुझे जुलमी गडे, मजकडे रोखून पाहू नका' असं म्हणण्याची वेळ महाराष्ट्रावर आली आहे. कारण नागरिक हैराण आहेत डोळ्याच्या साथीनं. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये एक लाखापेक्षा अधिक लोक डोळे आल्यानं म्हणजेच डोळ्याच्या आजारानं हैराण आहेत.

महाराष्ट्रात अ‍ॅडिनो व्हायरसमुळे डोळ्याचे रुग्ण वाढले आहेत. पावसाळ्यात आर्द्रता मोठ्या प्रमाणात वाढते. यामुळे व्हायरस पसरण्याची आयती संधी मिळते आहे. ओलाव्यामुळे संसर्ग बराच काळ शरीरात राहतो.



डोळ्यांच्या आजाराने नागरिक हैराण झाले आहेत...

त्यामुळे आपल्याला वारंवार घाम येतो आणि यामुळे आपण आपला चेहरा पुसत राहतो. चेहरा पुसताना आपण डोळ्यांनाही हात लावत राहतो. या सर्व कारणांमुळे संसर्ग होतो आणि डोळे येण्याची साथ पसरतेय.

यामुळे महाराष्ट्रात 31 जुलैपर्यंतच्या शासकीय आकडेवारीनुसार जवळपास एक लाख रुग्ण डोळ्याच्या आजाराने त्रस्त आहेत.

डोळे येणे (Conjunctivitis) आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना काय आहेत यावर एक नजर टाकूयात:

डोळे येण्याची लक्षणे: डोळे लाल होणे, वारंवार पाणी गळणे, डोळयाना सूज येणे, काही वेळा डोळ्यातून चिकट द्रवपदार्थ बाहेरील बाजूस येतो, डोळ्याला खाज येते, डोळे जड वाटतात आणि डोळ्यात काहीतरी गेल्यासारखे वाटते.

### तुमचंही नाव भाई! भिडे गुरुजींच्या नावावरून फडणवीसांचा जगतापांना टोला

वृत्तसंस्था | मुंबई

संभाजी भिडे यांच्यामुद्द्यावरुन आज विधानपरिषदेत देखील विरोधकांनी गोंधळ घातला. यावेळी काँग्रेसचे आमदार भाई जगताप आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात शाब्दिक चकमक झाली. फडणवीसांनी जगताप यांना टोला लगावला यामुळं सभागृहात हशा पिकला. त्यानंतर जगताप यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिलं.

फडणवीस पुढे म्हणाले, "भाई जगताप तुम्ही म्हणतात म्हणून सर्व सत्य नसतं. त्याचं नाव मनोहर कुलकर्णी आहे. आम्हाला भाई जगताप हेच नाव माहिती आहे. मग आम्ही यावर प्रश्न विचारायचा का? तुमचंही नाव भाई आहे, आम्ही तुम्हाला भाई म्हणूनच ओळखतो. भाई जगताप हे रजिस्टर नाव आहे पण तुम्ही भाईगिरी करत नाही" या विधानानंतर सभागृहात हशा पिकला. नंतर फडणवीसांच्या या विधानावर भाई जगताप म्हणाले, "माझं रजिस्टर नाव भाई आहे मी वैचारिक भाई आहे. त्यामुळं मी भाईगिरी करत नसलो तरी वैचारिक भाईगिरी करत राहणार"

**न्यायालय** सोशल मीडिया, चित्रपट, टीव्ही शो इत्यादींद्वारे पसरवल्या जाणाऱ्या संस्कृतीचे अनुकरण किशोरवयीन आणि तरुण मुले-मुली करत आहेत.

## कायदा पुरूषांविरुद्ध पक्षपाती; लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणावर अलाहाबाद उच्च न्यायालयाची महत्वाची टिप्पणी

**अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या** न्यायमूर्ती सिद्धार्थ यांच्या खंडपीठाने आज महत्त्वपूर्ण निर्णय देताना विवेक कुमार मौर्य यांना कलम ३६३, ३६६, ३७६, ३२३, ५०४, ५०६, ३५४, ३५४-अ आयपीसी आणि ३/४ पॉक्सो कायद्यांतर्गत जामीन दिला. या प्रकरणात अल्पवयीन मुलीवर अपहरण, बलात्कार आणि विविध लैंगिक गुन्ह्यांचा समावेश आहे.यावेळी अलाहबाद उच्च न्यायालयाने आज महत्वाचे निरीक्षण नोंदवले आहे.

लैंगिक गुन्ह्यांची खरी प्रकरणे आता अपवाद आहेत. यामध्ये प्रामुख्याने बलात्काराच्या खोट्या आरोपांचा समावेश आहे. आरोपींसोबत दिर्घकाळ शारीरिक संबंध ठेवल्यानंतर मुली आणि स्त्रिया चुकीच्या पद्धतीने एफआयआर नोंदवतात, अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती सिद्धार्थ यांनी आपल्या निकालात म्हटले आहे की, "न्यायालयात मोठ्या प्रमाणात प्रकरणे येत आहेत ज्यात मुली आणि महिला आरोपींसोबत दीर्घकाळ शारीरिक संबंध ठेवल्यानंतर खोट्या आरोपांवर प्रथम माहिती अहवाल दाखल करून अयोग्य फायदा घेतात."

“अशा जामीन अर्जांचा विचार करताना न्यायालयांनी अत्यंत सावध राहण्याची वेळ आली आहे. कायदा पुरूषांच्या बाबतीत खूप पक्षपाती आहे. एफआयआरमध्ये कोणतेही बिनबुडाचे आरोप करणे आणि सध्याच्या प्रकरणाप्रमाणे कोणालाही अशा आरोपांमध्ये अडकवणे खूप सोपे आहे", असे न्यायमूर्ती सिद्धार्थ यांनी म्हटले आहे.

न्यायमूर्ती सिद्धार्थ पुढे म्हणाले, “सोशल मीडिया, चित्रपट, टीव्ही शो इत्यादींद्वारे पसरवल्या जाणाऱ्या मोकळेपणाच्या संस्कृतीचे अनुकरण किशोरवयीन आणि तरुण मुले-मुली करत आहेत. जेव्हा त्यांचे वर्तन भारतीय सामाजिक आणि कौटुंबिक नियमांशी संघर्ष करते आणि मुलीच्या कुटुंबाच्या सन्मानाचा प्रश्न येतो तेव्हा अशा दुर्भावनापूर्ण खोट्या एफआयआर दाखल केल्या जातात.

"काही वेळ दीर्घ काळ लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर, कोणत्याही मुद्द्यावर मुलगा आणि मुलगी यांच्यात वाद होतात तेव्हा अशा प्रकारचे एफआयआर नोंदवले जातात. अशा प्रकरणात जोडीदाराचा स्वभाव वेळोवेळी बदलतो, मग त्यांना कळते की त्यांचे नाते आयुष्यभर टिकू शकत नाही, मग ते तक्रार दाखल करतात, असे न्यायालयाने म्हटले.

न्यायालयाने असेही म्हटले आहे की, संरक्षण कायद्यात मुली/महिलांचा वरचष्मा असल्याने, सध्याच्या प्रकरणांसारख्या प्रकरणात महिला सहजपणे मुलगा किंवा पुरुषाला गोवण्यात यशस्वी होतात.










## REQUIRED

**Need a Skill Experienced VMC and CNC Operator, Setter /Programmer in Manufacturing Company.**

**Location: Satpur nashik**

9422771796
7420098417
















## प्रॉपर्टीविषयक

**नाशिक तसेच नाशिकरोड येथे शॉप, फ्लॅट, प्लॉट किंवा रो-हाऊस शोधताय ?**

...तर आम्हाला एकदा नक्की संपर्क करा !

**Ashtavinayak**
Real Estate Consultant

**Call: 8329080172, 7758804381**

## समर्थ सर्व्हिसेस

Department of Registration & Stamps Maharashtra Government

**E-Registration Service**

**RENT AGREEMENT**

(ऑनलाईन भाडे करारनामा)

(Reg. Leave And Licence)

@Doorstep Service Nashik City, All Over India & Outside India

घरपोच सेवा नाशिक सिटी, भारतात आणि भारताबाहेर

* कोर्ट मॅरेज ऑनलाईन फॉर्म * मॅरेज सर्टीफिकेट *
* मराठी, हिंदी, इंग्रजी, टायपींग * गॅझेट, शॉप ॲक्ट, उद्यम आधार इ. *

शॉप नं.जी ४, महाराष्ट्र ॲक्वेरीयमच्या मागे, ठक्कर बाजार, न्यु सीबीएस, नाशिक
शॉप नं. ९, भुयारी मार्ग, जिल्हा न्यायालयासमोर, जुने सीबीएस नाशिक

9146447448 / 9423327611 / 8080974397




## Sai Baba Tours & Travels

**Tours Package**

| | |
|---|---|
| नाशिक - शिर्डी | Rs. 2000 |
| नाशिक - मुंबई | Rs. 2500 |
| नाशिक - पुणे | Rs. 2500 |
| नाशिक - त्र्यंबकेश्वर | Rs. 800 |

Call Now
**92092 42113**

*Rates Are For Drop Only
*Toll Extra










---

# NASHIK MARKET

## 999 रुपयांत 7 दिवस जाहिरात !

तुमची जाहिरात १ दिवस नाशिक कॉलिंगच्या फेसबुक पेजवर, १ दिवस व्हॉट्सॲपच्या सर्व १२ ग्रुपवर आणि ई-पेपरवर ७ दिवस प्रसिद्ध होईल !

**Call: 9890450002**

पोलीस डायरी | माझ्याकडे पुरावे असल्याचे गाडेकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

# संभाजी भिडे यांच्याविरुद्ध नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नाशिक कॉलिंग प्रतिनिधी**

महात्मा फुलेंबाबत वादग्रस्त विधान केल्या प्रकरणी संभाजी भिडे यांच्यावर नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, तपासासाठी सदरचा गुन्हा अमरावती शहर राजपेठ पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

याबाबत नाशिकरोड पोलीस ठाण्यात क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले कला व सांस्कृतिक मंडळाचे नाशिकरोड अध्यक्ष संतोष पोपट गाडेकर राहणार जिजामाता नगर, पेंढारकर कॉलनी, जेलरोड, नाशिकरोड यांनी फिर्याद दिली असून, त्यात म्हटले आहे की, अमरावती शहर येथील राजपेठ पोलीस ठाणे हद्दीत 30 जुलै रोजी व्याख्यानादरम्यान शिव प्रतिष्ठान हिंदुस्थानाचे प्रमुख संभाजी भिडे यांनी महात्मा फुले, राजाराम रॉय, व शिर्डी येथील साईबाबा यांच्याविषयी भाषणात धर्माचा अपमान करण्याचा उद्देशाने वादग्रस्त वक्तव्य केले.

सुमारे तीन तासांच्या भाषणात संभाजी भिडे यांनी महात्मा फुले यांच्याबद्दल अतिशय हीन दर्जाची भाषा वापरली आहे. त्यात शिवीगाळ करून असभ्य भाषा वापरली गेली आहे.



धार्मिक भावना दुखावण्याच्या उद्देशाने शिर्डी येथील साईबाबा यांच्याबाबत वाक्य वापरताना एका ठराविक समाजाचा उल्लेख करीत वाईट-साईट शब्दांचा वापर केला आहे. याबाबत माझ्याकडे पुरावे असल्याचे गाडेकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

संभाजी भिडे यांची अशी विधाने, मजकूर, शिव्या, द्वेष हा वृत्तवाहिन्यांमधून तसेच समाजमाध्यमातून प्रसिद्ध झालेला आहे, असे बोलून निरनिराळ्या गटांमध्ये शत्रुत्व वाढवून, अशा प्रकारची विधाने करून शिव प्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे यांच्यावर दोन समाजांत धर्मात तेढ निर्माण होईल असे कृत्य करणे, त्यांच्या या मनोवृत्तीला आळा बसावा म्हणून सदर समाजाची बेअब्रू केली म्हणून त्यांच्याविरुद्ध फिर्याद देत असल्याचे गाडेकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात भादवी कलम 295, 153 (अ)298,500 प्रमाणे गुन्हा दाखल करून अमरावती शहर राजपेठ पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

संभाजी भिडेंविरोधात गुन्हा दाखल होण्यासाठी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले कला व सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांनी मंगळवारी नाशिकरोड पोलिसांत धाव घेतली.

यावेळी पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त आनंदा वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास वांजळे यांनी मंडळाचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांची समजूत काढून गुन्हा दाखल करण्याबाबत सकारात्मकता दाखवली आणि गुन्हा दाखल केला.

यावेळी माजी आमदार योगेश घोलप, कामगार नेते जयंत गाडेकर, युवा पदाधिकारी योगेश गाडेकर, व्यापारी बँकेचे संचालक सुधाकर जाधव, माजी नगरसेवक भय्या मनियार, शंकर मंडलिक, केशव पोरजे, विशाल गाडेकर, रवींद्र पेठकर, संतोष पुंड, जनार्दन ढोकणे, सुनील पुंड, सुनील गाडेकर, आदेश जाधव, कचेश्वर पवार, विजय गाडेकर, विकास गिते, आदर्श गाडेकर, पुरुषोत्तम फुलसुंदर, भारत जेजुरकर, साहिल जाधव, रोहित जाधव, प्रदीप गाडेकर, सागर महाजन, संजय अढांगळे, सुनील गांगुर्डे, किशोर आहिरे आदी उपस्थित होते.

---

## घोटी-सिन्नर महामार्गावर खड्डेच खड्डे!

नाशिक कॉलिंग | प्रतिनिधी

घोटी-सिन्नर महामार्गावरील तातळेवाडी, धामणी, पिंपळगाव मोर या ठिकाणी रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्याने वाहनचालक या खड्ड्यांना वैतागले आहेत.

समृद्धी महामार्गाने येणारी वाहतूक भरवीर फाटा येथून घोटी-सिन्नरला मार्गक्रमण करत आहे. त्यामार्गे येणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याने घोटी-सिन्नर मार्गावर वाहतुकीत वाढ झाल्याने खड्ड्यांमुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे.

बेलगाव शिवारातील तातळेवाडी येथे समृद्धी महामार्गाचे काम सुरू असून, येथे मोठ्या प्रमाणात वाहतुकीने खड्डे पडले आहेत.

त्यामुळे त्वरित या रस्त्यांची दुरुस्त करण्याची मागणी पंचायत समितीचे माजी उपसभापती पांडुरंग वारुंगसे, बेलगावचे सरपंच संतोष वारुंगसे यांनी केली आहे.

---

दणका पोलिसांच्या या विशेष मोहिमेचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

## रोडरोमिओ आणि टवाळखोरांना नाशिक शहर पोलीसांचा दणका; 71 जणांवर कारवाई

**(नाशिक कॉलिंग प्रतिनिधी):** पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या आदेशाने शहरातील सर्व पोलीस ठाणे हददीत रोडरोमिओ यांच्या विरूध्द कारवाई करण्यात आली.

स्थानिक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पुरुष व महिला सेवकांनी शाळा, महाविद्यालय तसेच गर्दीच्या ठिकाणी ही कारवाई करून टवाळखोरांना यांना चांगलाच दणका दिला. पोलिसांच्या या मोहिमेचे पालकांनी स्वागत केले आहे.

या विशेष मोहिमेत एकुण 71 जणांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 112, 117 अन्वये कारवाई करण्यात आली.

तसेच नाशिक शहरातील शाळा, महाविद्यालय परिसरातील शंभर मीटर अंतरावरील ज्या पानटपऱ्यांवर प्रतिबंधीत असलेला गुटखा, सिगारेट, तंबाखु विक्री होतांना आढळुन आले, अशा पानटपरी चालकांवर व धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती विरूध्द कोप्ता कायदयाअंतर्गत एकुण 37 कारवाया करण्यात आल्या. अशा प्रकारे रोड रोमिओ व धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती विरूध्द कारवाई करण्यात आली.



या विशेष मोहिमेत एकुण 71 जणांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 112, 117 अन्वये कारवाई करण्यात आली.

---

## समन्यायी पाणी वाटपामुळे टंचाईची टांगती तलवार!

नाशिक कॉलिंग | प्रतिनिधी

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा निर्माण झाल्याने महापालिका आयुक्तांनी पाणीकपातीचा प्रस्ताव रद्द केल्याने पाण्याबाबत किमान वर्षभर पाण्याची भ्रांत मिटल्याचे वाटत आहे.

मात्र, मराठवाड्याला पाणीपुरवठा करणारे जायकवाडी धरण अवघे ३२ टक्के भरले आहे. गोदावरी ऊर्ध्व खोऱ्यातील समन्यायी पाणीवाटप तत्त्वानुसार जायकवाडी धरणामध्ये ६५ टक्क्यांपेक्षा कमी साठा असल्यास वरच्या धरणांमधून पाणी सोडावे लागणार आहे.

त्यामुळे जायकवाडी धरण भरत नाही, तोपर्यंत नाशिककरांवर पुढील काळात पाणी टंचाईचे सावट कायम राहणार आहे. ऑगस्ट महिन्यात पाऊस ओढ देईल, असे संकेत हवामान विभागाने दिले आहे. त्यामुळे राज्याचा विचार करता पाण्याचे संकट कायम आहे.

---

## नाशिक जिल्ह्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा !



**(नाशिक कॉलिंग प्रतिनिधी):** राज्यभरामध्ये मान्सूनने दमदार हजेरी लावली असली तरी नाशिक जिल्ह्याला मात्र अद्यापही जोरदार पावसाची प्रतीक्षाच असल्याचं बघायला मिळते आहे. पावसाळ्याचे दोन महिनेउलटून आता तिसरा महिना सुरु झाला असतानाही जिल्ह्यात अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यात अद्यापही दमदार पाऊस झाला नसल्याने हलक्या सरींवर भाताची आवणी शेतकऱ्यांनी केली आहे.

---

कारवाई बंदी असतानाही जिल्ह्यात छुप्पारीतीने प्रतिबंधित गुटख्याची तस्करी करण्यात येऊन विक्री केली जाते.

## ग्रामीण पोलिसांकडून 2 कोटींचा गुटखा जप्त; तब्बल 178 अटकेत

**(नाशिक कॉलिंग प्रतिनिधी):** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधी तंबाखूची (गुटखा) साठेबाजी करून विक्री होत होती.

त्याविरोधात ग्रामीण पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी करीत गेल्या दोन महिन्यांत तब्बल १६९ गुन्हे दाखल करीत दोन कोटींचा गुटखा जप्त केला आहे.

बंदी असतानाही जिल्ह्यात छुप्पारीतीने प्रतिबंधित गुटख्याची तस्करी करण्यात येऊन विक्री केली जाते. त्याविरोधात पोलिस अधीक्षक शहाजी उमाप यांनी दोन महिन्यांपासून विशेष मोहीम उघडली आहे.६ जूनपासून या अभियानाला सुरवात झाली. त्यासाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ग्रामीणमधील ४० पोलिस ठाण्यांच्या प्रभारींना आपापल्या हद्दीतील अवैध व्यवसायांसह प्रतिबंधित गुटख्याविरोधात थेट कारवाईचे आदेश दिले आहेत.

त्यानुसार ग्रामीण पोलिस पथकांनी जिल्ह्यात प्रतिबंधित गुटख्यांची साठेबाजी करणाऱ्यांवर छापे टाकण्यास सुरवात केली आहे.

जूनमध्ये १०९ गुन्हे दाखल करीत एक कोटी ३६ लाख सहा हजार ७८५ रुपयांचा गुटखा जप्त केला; तर गेल्या जुलैमध्ये ६० गुन्हे दाखल करीत ७२ लाख ८६ हजार १५२ रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

या दोन महिन्यांत १७८ संशयितांना अटक करण्यात आली. यातील ३७ संशयित नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात असून, सात संशयित पोलिस कोठडीत आहेत. ३७ संशयित कारागृहात प्रतिबंधित गुटख्याची साठेबाजी व विक्री प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी दोन महिन्यांत १७८ जणांना अटक केली होती.

गुटखा, पानमसाला, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविषयी माहिती असल्यास नागरिकांनी थेट ग्रामीण पोलिस हेल्पलाईन ६२६२२५६३६३ यावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

### What's the Buzzword? -2



आजचा Buzzword
' Happening '
आवडतो मला हा तरुणाईचा लाडका शब्द."अगं काय Happening Place आहे ती".
ऐकुनच उत्सुकता वाढली की नाही पहा त्या जागेची ! हीच तर जादू आहे ह्या शब्दाची.

हा शब्द सर्व प्रथम ॲलन कॅपरो या अमेरिकन कलाकाराने वापरला अशी माहिती मिळते.
डिक्शनरीत याचा उगम १९५० च्या सुमारास 'उत्स्फूर्त आविष्कार ' किंवा 'चैतन्यपूर्ण ' या अर्थी सापडतो पण मला आवडते ती या शब्दातली सकारात्मकता.
रोज आपण किती सहजपणे नकारात्मक शब्द वापरत असतो.
"बाई ची दांडी ,गॅस संपला आणि नेमके बँकेलाही जावे लागले त्यात ट्रॅफिक लागला ,सगळा वैताग नुस्ता " . आता हेच वाक्य असे म्हणून बघा " अगं आजचा दिवस काय बिझी होता म्हणून सांगू, घरातली कामं,बँकेचे काम , एकदम happening day" .

कदाचित happy शब्दाशी साम्य
म्हणून की काय happening
म्हणले की कसे happy happy
वाटत नाही?
अनुभवून बघा या शब्दाची जादू आणि सकारात्मकता.मग पहा
ही सकारात्मकता तुम्हाला Happening व्यक्ती बनवते की नाही.
अश्याच पर्यायी सकारात्मक शब्दांचा happening खेळ खेळून बघा कधीतरी.
Happening चा अर्थ Up to date म्हणजेच काळा बरोबर
चालणारा असाही होतो.मग आपणही काळा बरोबर राहिले पाहिजे ना म्हणूनच हा शब्द प्रपंच.

आणखी एक Buzzword बघुया पुढच्या भागात.
**- जयश्री दिक्षित**

हवामान अंदाज | राज्यातल्या अनेक भागांमध्ये आज येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## राज्यात पाऊस पुन्हा बरसणार, मुंबई-पुण्यासह 'या' जिल्ह्यांमध्ये मुसळधारा

**मुंबई |** राज्यात उशिराने दाखल झालेला मान्सून जोरदार बरसला. पण ऑगस्टच्या पहिल्या दोन दिवसात मात्र पावसाचा जोर कमी झाल्याचं पाहायला मिळालं. पण अशात आज पुन्हा एकदा पावसानं हजेरी लावली आहे. राज्यातल्या अनेक भागांमध्ये आज येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडेल अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.



बुधवारपासून राज्यात पाऊस पुन्हा एकदा सक्रिय होण्याची शक्यता आहे...

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे तर ठाणे, पालघरमध्ये हलका पाऊस होईल. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूरमध्ये काही ठिकाणी मध्यम पाऊस पडेल अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, उर्वरित महाराष्ट्रात मात्र हवामान कोरडे असेल किंवा पावसाची रिमझिम पाहायला मिळेल. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर धाराशिवमध्ये हलका पाऊस पडेल तर विदर्भात पावसाने चांगलीच उघडीत दिल्याचे पाहायला मिळते.

बुधवारपासून तीन ते चार दिवस राज्यात मुसळधार पाऊस पडू शकतो. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यातील पावसावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, अशी माहिती भारतीय हवामान विभागातर्फे मंगळवारी देण्यात आली.

बुधवारपासून राज्यात पाऊस पुन्हा एकदा सक्रिय होत असून रायगड, रत्नागिरीला बुधवार, गुरुवारसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रायगड आणि रत्नागिरीत या दोन दिवसांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. सिंधुदुर्गात मात्र गुरुवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईमध्येही बुधवार आणि गुरुवार हे दोन दिवस तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता असून गुरुवारी पालघर आणि ठाणे जिल्ह्यालाही ऑरेंज अ‍ॅलर्ट देण्यात आला आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यात शुक्रवारीही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल.

**Update** नितीन देसाईंनी पहाटे साडे चारच्या सुमारास एन डी स्टुडिओमध्ये गळफास लावून आत्महत्या केली.

## खोली आतून बंद, खिडकीतून पाहिलं तर..; नितीन देसाईंच्या बॉडीगार्डनं सांगितला संपूर्ण घटनाक्रम

**मुंबई:** सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांच्या आत्महत्येनं चित्रपटसृष्टीला धक्का बसला आहे. जोधा अकबर, पानीपत, लगान अशा ऐतिहासिक चित्रपटांच्या सेट उभारणीचं काम त्यांनी केलं होतं. भव्यदिव्य सेट्सच्या उभारणीत त्यांचा हातखंडा होता. त्यासाठी त्यांनी कर्जतमध्ये एनडी स्टुडिओ उभारला. तब्बल ५२ एकरवर पसरलेल्या स्टुडिओत अनेक चित्रपटांचं चित्रीकरण झालं. त्यांच्या अकाली निधनानं साऱ्यांनाच धक्का बसला. एन डी स्टुडिओ हा देसाईंच्या आयुष्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. मात्र याच स्टुडिओमध्ये त्यांनी त्यांच्या आयुष्याची अखेर केली. त्यांच्या निधनवार्तेनं संपूर्ण चित्रपटसृष्टी हादरली.

नितीन देसाईंनी पहाटे साडे चारच्या सुमारास एन डी स्टुडिओमध्ये गळफास लावून आत्महत्या केली. आर्थिक विवंचनेतून त्यांनी टोकाचं पाऊल उचलल्याचं बोललं जात आहे. पोलीस दलातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, देसाई काल रात्री दहाच्या सुमारास त्यांच्या खोलीत गेले. सकाळी ते बाहेर आले नाहीत. बराच वेळ झाला तरी देसाई दिसले नसल्यानं त्यांचे सुरक्षारक्षक आणि अन्य लोकांना त्यांच्या खोलीचं दार ठोठावलं. मात्र ते आतून बंद होतं. त्यामुळे बाहेर असलेल्यांनी खिडकीतून आत पाहिलं. तेव्हा त्यांना देसाई पंख्याला गळफास लावलेल्या स्थितीत दिसले. याची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी देसाईंचा मृतदेह खाली उतरवला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला.

### गुगलचे 'एआय' वृत्तलेखनही करणार; वृत्तपत्रांना दाखविले प्रात्यक्षिक

वॉशिंग्टन | वृत्तसंस्था

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय'ची सध्या सर्व क्षेत्रात चर्चा आहे. ग्राहकोपयोगी सेवा, उद्योग, शैक्षणिक आणि मनोरंजन क्षेत्रात 'एआय'च्या वापराच्या चाचण्या झाल्या आहेत. प्रसारमाध्यमांच्या वृत्तविभागातही 'एआय'ची चाचपणी झाली आहे. आता गुगल कंपनीने त्यांचे नवे 'एआय'आधारित तंत्रज्ञान 'जेनेसिस' सादर केले आहे. याद्वारे वृत्तलेखन करता येणे शक्य होणार आहे. गेल्या महिन्यात 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'एनबीसी न्यूज' आणि 'गिझमोडो' या संकेतस्थळाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला होता.

मार्केट वॉच | शेअर बाजारात कमकुवत जागतिक संकेतांमुळे मोठी घसरण झाली आहे.

## शेअर बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदार हवालदिल! का आपटला बाजार?



**सेन्सेक्सवर 'या' शेअर्समध्ये घसरण:**
**बीएसई सेन्सेक्सवर टाटा स्टील आणि टाटा मोटर्सचे शेअर्स 3 टक्क्यांहून अधिक घसरले. याशिवाय लार्सन अँड टुब्रो, भारती एअरटेल, अ‍ॅक्सिस बँक, कोटक महिंद्रा बँक, पॉवरग्रिड, एचडीएफसी बँक, टायटन, आयटीसी, बजाज फायनान्स आणि इंडसइंड बँक बजाज फिनसर्व्ह, एनटीपीसी, जेएसडब्ल्यू स्टील आणि एसबीआयच्या शेअर्समध्ये 1 टक्क्यांपेक्षा जास्त घसरण झाली.**

शेअर बाजारात कमकुवत जागतिक संकेतांमुळे मोठी घसरण झाली आहे. बाजाराच्या कमजोरीमुळे बीएसई सेन्सेक्स सुमारे 1,000 अंकांनी घसरला आहे. त्याचप्रमाणे निफ्टीही जवळपास 300 अंकांनी घसरून 19,450 च्या जवळ आहे. बाजारात मोठी विक्री होत आहे, ज्यामध्ये ऑटो, मेटल आणि पीएसयू बँकिंग क्षेत्रातील शेअर्स आघाडीवर आहेत.

आजच्या व्यवहाराच्या शेवटी बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. BSE वर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप 303.29 लाख कोटी रुपयांवर बंद झाले आहे, तर मागील ट्रेडिंग सत्रात मार्केट कॅप 306.80 लाख कोटी रुपये होते. म्हणजेच आजच्या व्यापारात 3.51 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

**बाजारातील प्रचंड घसरणीची कारणे:**
FITCH ने US चे रेटिंग केले कमी, अमेरिकन, युरोपियन आणि आशियाई बाजारात जोरदार विक्री, डॉलरच्या तुलनेत रुपयाची मोठी घसरण, हेवीवेट स्टॉक्समध्ये जोरदार विक्री.

**शेअर बाजाराची क्षेत्रीय स्थिती**
आज सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरणीसह बंद झाले. ऑटो, कॅपिटल गुड्स, पीएसयू बँक, पॉवर आणि मेटल निर्देशांकात दोन टक्क्यांहून अधिक घसरण दिसून आली. त्याचप्रमाणे हेल्थकेअर, आयटी आणि तेल आणि वायू निर्देशांकात एक टक्क्याहून अधिक घसरण दिसून आली. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप 1.50-1.50 टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाले.

### एका पैशाचा जरी भ्रष्टाचार सापडला, तर जाहीर फाशी द्या - अरविंद केजरीवाल

वृत्तसंस्था | दिल्ली

दिल्ली अबकारी धोरणप्रकरणी सीबीआयने दिल्लाचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांची चौकशी केली होती. या प्रकरणात माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आधीपासूनच कारागृहात आहेत. यावर बोलताना केजरीवालींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना आव्हान दिलं आहे.
आपल्याला माझ्या विरोधात एका पैशाचा जरी भ्रष्टाचार सापडला, तर मला जाहीर फाशी द्या. पण हा रोजचा तमाशा बंद करा, असं वक्तव्य अरविंद केजरीवाल यांनी केलं आहे.
एवढंच नाही, तर केंद्र सरकारने आपल्या मागे, आपण चोर आहोत हे सिद्ध करण्यासाठी तपास संस्था लावल्या आहेत, असंही केजरीवाल यांनी पत्रकारांशी बोलतांना म्हटलं आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक: मंदार विवेक देशपांडे* (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)
RNI No. MAHMAR51790 | कार्यालयाचा पत्ता: बी-१, रवी चेंबर्स, कॅनडा कॉर्नर, नाशिक. फोन: ०२५३४००१३२८